# IJ MATTERS

SHRINE OF THE INFANT JESUS

**Nashik India: Volume III Issue 9 – November 2024**

# CONTENTS


| NO | TOPIC | PAGES | AUTHOR |
|---|---|---|---|
| I | SHRINE HAPPENINGS | 3-7 | ERROL |
| II | COMMEMORATION OF THE FAITHFUL DEPARTED | 8-9 | ERROL |
| III | CHRIST OUR KING | 10 | GODFREY |
| IV | SAINTS AND SOULS OF NOVEMBER | 11 | GODFREY |
| V | सिनड नारी !! | 12 | वेन्सी डिमेलो. |
| VI | पोप कधीही चुकत नाहीत !! | 13-15 | वेन्सी डिमेलो |
| VII | एक नोव्हेंबर !! | 16-19 | वेन्सी डिमेलो |
| VIII | आगमनकाळ!! (Advent) | 20-22 | मीना बनसोडे. |
| IX | INVITATION TO OUR CHRISTMAS PARTY | 23 | ERROL |

# SHRINE HAPPENINGS IN NOVEMBER 2024

The cold has come to Nashik and for those who enjoy the cold, the weather is invigorating and refreshing.

The month began with the celebration of "All Saints". In the eighth century, Pope Gregory III consecrated a new chapel in the Basilica of St. Peter to all saints on November 1, and he fixed the anniversary of this dedication as the date of the feast. In the ninth century, Pope Gregory IV extended the celebration of All Saints for the entire Church and since then, the Church celebrates the feast of all Saints on this date.

While the celebration of this solemnity may be seen on the one hand as a remembrance or memorial of the numerous courageous men and women who lived lives of selfless love, it may also be seen as an event which makes each of us aware that we, too, as those who have gone before, are capable of living such lives. It is a celebration of possibilities, potential and promise. They could, we also can.

A day after the feast of All Saints, was the "Commemoration of the faithful departed" This is a better title than the one that is often used namely" All Souls day". {see below my article on this point and the meaning of the commemoration).

Fr. Errol was busy with Retreats from the end of October and through November.

From October 27-November 1, 2024 he gave a retreat to 29 priests of the Pune Diocese at Montfort Bhavan in Pune. The priests were touched by the grace of the Spirit and went back to their Parishes and other ministries with renewed vigour and enthusiasm.



From November 3-9, 2024, Fr. Errol gave a retreat to 32 priests of the Archdiocese of Goa, Daman and Diu. It was held at the St. Joseph Vaz renewal centre in Old Goa. The ambience was perfect for silencing and Retreating. The priests got into the retreat from the word GO. The closeness of the Centre to so much of rich history and tradition helped the priests to listen to God's Spirit. This was the second group (the retreat for the first group was held from August 18-25, 2024 and 46 priests made that retreat)




The Jesuit team at the Shrine conducted the seventh Laity retreat from November 15-17, 2024. 31 lay people attended the Retreat and the feedback was very positive. Many commented on the practicality of the sessions and how they could use in their daily lives what they had learned through their openness to God’s Spirit. They went back to their homes physically and spiritually refreshed.



Our work of “Food from the heart and to the body” continues with our multipronged approach. Through the help of generous benefactors, we reach out by providing meals to especially abled men and women. This is done on a regular basis.



Now that the cold has arrived in Nashik and considering that it can be very challenging for those who live on the streets, we were able – through the generosity of devotees of the Infant Jesus – to provide mats and blankets to those who reside on the footpath and in the slums of Nashik.





We will enter the season of Advent on December 1, 2024 and we pray that we will wait with anticipation and open hearts to welcome the Christ child who wants to be born even in our broken world.

We have planned our annual Christmas party for the differently abled children from Nashik on December 23, 2024. We are extremely grateful to you for your support and generosity. Please see some photographs of last year and the invitation to you for this year's party.





The girls and boys hockey teams of our School have gone to Satara to participate in the State level hockey tournament. I gave them two bits of advice before they left. One was to do their best and the other was to play as a team. I am confident that they will follow these instructions come back winners in their eyes.




We are very grateful to you for your constant support to the Shrine and our work here. May God be with you and your families; may the Infant Jesus bless you all and may Joseph and Mary always intercede.

Fr. Errol Fernandes SJ and team

November 2024

## Commemoration of the Faithful Departed

A day after the feast of All Saints, was the “Commemoration of the faithful departed”. This is a better title than the one that is often used namely” All Souls day”.

This is because in the Creed (which is the article of faith of the Catholic Church), we believe not in the resurrection of the “soul”, but of the body. When Jesus appeared to the disciples after his death and resurrection, he appeared not as a “soul” but with a different body (a body that could walk through closed doors and appear and disappear at will – Jn 20:19; Lk 24:31) and yet one that was continuous with his earthly body. This is why he could show them his hands and his side which had been nailed and pierced respectively (Jn 20:20) invite Thomas to put his finger in the nail marks and his hand in his side that had been pierced (Jn 20:27) prepare breakfast for his disciples (Jn 21:12) and even eat a piece of broiled fish before their eyes after requesting it (Lk 24:41-43). The challenge with focusing too much on the soul (which is from the Greek (ψυχή) psuché. This word is translated as follows - (a) the vital breath, breath of life, (b) the human soul, (c) the soul as the seat of affections and will, (d) the self, (e) a human person, an individual. What is interesting in these translations is that the majority of them seem to refer to the inner person (breath, affections, will) or individual. The one translation which uses the word “soul” does not define it. One of the biggest challenges with making a dichotomy between soul and body is that we tend to separate rather than harmonize. We make too clear distinctions between the sacred and the secular, prayer and work, the inside and outside and unfortunately this leads to them and us. We forget that all of us as individuals are one composite whole and that even as individuals we are interconnected with each other and nature. Since we do not feel the interconnected with others and nature, we continue to live selfishly instead of with concern for the other. We also tend to abuse and destroy nature instead of using it as we ought to.

The question of where we go when we die is a question that has puzzled and continues to puzzle the minds of many. It is a question that brings

out the fact that we realize that this life has to end and all of us no matter how strong we are, no matter how rich or poor have to die someday. Death has been and will continue to be a mystery. While we know that we have to die and today with the advancement of science and technology can delay death by a few days, months or even years in some cases and can tell how a person may have died, what we will never know, what will always remain a mystery is why a person must die at a particular moment in time. The Commemoration of the faithful departed does not provide the answer to this question, but informs us that for us as believers, death is not and can never be the end.

If in the past the focus of the feast was on praying for the deliverance of the "souls" in purgatory who were regarded as the "Church suffering" and needed our prayers so that they could join in heaven the saints and add to the number of the "Church triumphant", today the focus is different. This focus is brought out powerfully by St. Paul in his letter to the Thessalonians (1 Thess 4:13-18) where he says that we cannot behave as a people who have no hope. Our grief has to be a controlled grief. It has to be a grief that has its basis in the hope that all who have died in Christ are sure to rise with him. After God has spoken in Jesus, death is seen only as transition from one kind of life to another. In the words of the sixteenth century poet John Donne: "Death, thou shalt die".

Fr. Errol Fernandes SJ
November 2024

**CHRIST OUR KING**

Of many kings that came and went
Theres one who will not fade
He suffered, died and rose again
And history was remade

He did not wear distinguished dress
Nor had expensive chums
His palace was the roadside rest
Where all in need could come

He did his best to heal and guide
His teachings still are heard
He called on friends to share his way
But some thought him absurd



To follow him will have its risk
The world won't see the point
And trying to keep him company
Could put us out of joint

But he's a type that fascinates
No kings or lords compare
And to his kingdom all are called
If we will trust and dare

Christ fills the heart of everyone
Who shares his life and mission
To make the world a better place
Steadfast in love's commission

Godfrey SJ

**SAINTS AND SOULS OF NOVEMBER**

November brought us memories
Of Souls and Saints sublime
We may have known a few of them
But countless pass through time

They tell us that our lives like theirs
Are always in God’s sight
Though no acclaim may come our way
We share in heaven’s light



The Feasts of Souls and Saints confirms
They’re with us every day
And in a solidarity that’s shared
We journey on life’s way

Godfrey SJ

सिनड नारी !!
वेन्सी डिमेलो.

नारीसाठी  निर्णय
घ्यायला
भरली भक्त नरांची
पंगत.
आतापर्यंत  ऐकून
घेतलं
आता नाही  नरांचे
ऐकणार.
खवळल्या  आहेत
मर्दानी नारी.
तुम्ही कोण आमचे
व्यक्ती
स्वातंत्र्य लाथाडणारे?
आम्हीच
आमचा घेऊ निर्णय
यापुढे
आम्हा नारींचे चर्चच
असेल वेगळे.
मानवतेचे न समतेचे
मंदिर.
तुमचे राहूदे तुम्हाला
लखलाभ....
बुरसटलेले विटाळलेले.

पोप कधीही चुकत नाहीत !! (Infallibility)

वेन्सी डिमेलो.

पोप कधीच चुकत नाहीत.(Infallibility) ह्या संकल्पनेला पहिला दणका मार्टिन ल्युथरच्या बंडाने दिला. हे प्रॉटेस्टनांचे आव्हान कॅथोलिक चर्च पेलू शकले नाही. आणि नव विचारांचे, नव बदलाचे वारे कॅथोलिक चर्चमध्ये घोंगावू लागले.

" पृथ्वीवर जे काही तू बांधशील ते स्वर्गात बांधले जाईल" (मत्तय १६:१९) येशूच्या या वचनाचे आतापर्यंत होऊन गेलेल्या पोप महाशयांनी अधिक स्वातंत्र्य घेतले. त्या वाक्यातील गर्भीत अर्थ नि त्यातील येशूच्या मूल्यांपेक्षा स्वताचे मुकादमी मनसुबे अधिक प्रमाणात वापरले गेले. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास "पोप सांगतील ती पूर्व दिशा." ते कधीच चूकू शकत नाहीत. चुकणार नाहीत. पोपमहा सांगतील ते अंतिम नि शाश्वत सत्य आहे. असाही इन्फॅलीबीटीचा अर्थ आहे.

आणि ज्या आसनावर पोप बसले आहेत ज्याला "कॅथेड्रा" म्हणतात. तेथून पोपने केलेली घोषणाही भाविकांनी अचूक नि शिरसावंद्य मानावी व तेथूंन घेतलेल्या निर्णयावर प्रश्न विचारू नयेत. पोपच्या या निर्णयप्रक्रियेत प्रापंचिकांचा सहभाग नसेल. ही खुद्द देवा कडून नि पवित्र आत्म्याकडून मिळालेली "स्ट्रेट देणगी" आहे. अशी ठाम श्रद्धा ठेवावी. ह्यावर नो आर्गुमेंड! नो युक्तीवाद!!

अशा शिरस्त्यामुळे कॅथोलिक चर्च अनेक जटील चुका करून बसले. हा इतिहास आहे. आणि त्याबद्दल कॅथोलिक चर्चला माफीनामाही लिहून द्यावा लागलेला आहे. तरीही ह्या अचूकपणाचा इन्फॅलीबीटीचा डॉगमा, कायदा, सिद्धांत ह्यावर चर्च अजूनही विश्वास ठेवते. त्याच रीती रिवाज रुढीपरंपरेचे पालन करते.

ज्या कॅथोलिक चर्चच्या पोप नववे पायस ह्यांनी १८५४ मध्ये मान्यता दिली. त्या डॉगमांना, सिद्धांताना आधुनिक प्रॉटेस्टन पंथ मानत नाहीत. ते म्हणजे. १)पवित्र मारिया देवाची आई. २) तिचे शाश्वत कौमार्य, ३) तिचा निष्कलंक गर्भसंभव. आणि ४) मेरीचे संदेह स्वर्ग नयन. मेरीने आपल्या कौमार्याला कोणतीही हानी न करता गर्भधारणा केली ( काऊन्सिल ऑफ द लॅटरीन ६४९) ह्याला कारण कार्यकारणभाव नि वैज्ञानिक आधार

नसल्याने प्रॉटेस्टन पंथीय मान्यता देत नाहीत. मात्र येशूची आई म्हणून तिचा आदर जरूर करतात. पण मेरी कायम स्वरुपी वर्जीन होती हा कॅथोलिकांचा मतप्रवाह मान्य करत नाही. तो कॅथोलिकांचा श्रद्धेचा भाग ते मानतात.

हे सारे डा॑गमा इन्फॅलीबीलीटीची उत्पत्ती आहे. बीजे आहेत. कुराण ३:४७ मध्ये मात्र मेरीच्या कौमार्याचे समर्थन करते.

गांधींचे ह्या संबंधीचे विचार खूप मौलिक आहेत. आणि ख्रिस्ती श्रद्धा न दुखवता ते विवेकी स्पष्टीकरण देतात.. येशू, मरीयेचा

त्यांच्या त्यागाशी बुद्धी प्रामाण्य राहून आदर करतात. ते म्हणतात....

" जेव्हा पहिल्याप्रथम मी बायबल वाचले तेव्हा मला असे दिसून आले की त्यात जे लिहिले आहे त्याचा जर आपण वाच्यार्थ  घेऊ लागलो किंवा त्यातला प्रत्येक उतारा ईश्वराचा शब्द म्हणून मानू लागलो तर त्यातल्या पुष्कळ गोष्टी आपल्या मनाला ग्राह्यच वाटत नाही. जी स्थिती बायबलची तीच जगातील साऱ्या धर्मग्रंथांची आहे. म्हणून येशूच्या अयोनिसंभवाच्या कथेचा ( कॅथोलिक डा॑क्ट्रीन) जेव्हा मी लक्ष्यार्थ घेतो तेव्हा मग मला त्यात अग्राह्य असे काही वाटत नाही."

"मात्र अयोनिसंभवासंबंधीची जी वचने बायबलात आहेत त्यांचा वाच्यार्थ जर मानायचा म्हटले तर तो माझ्या गळी उतरवणे कठीण वाटते. त्याने येशू विषयीचा माझा आदरभाव अधिक वाढेल असेही नाही. याचा अर्थ बायबलचे लेखक असत्यवादी होते असा मात्र नाही.

त्यांनी जे लिहिले ते उच्च भावोवस्थेतून लिहिले."

"मी धर्मग्रंथाचे मोल त्यात असलेल्या नीती-उपदेशांच्या आधारावरच करण्याची विद्या शिकलो आहे. चमत्कारात मला मुळीच गोडी वाटत नसे".(हरिजन.१८.४.१९३६)

गांधीजी, लिओ टॉलस्टॉय, अनेक बुद्धी प्रामाण्यवादी संत महंत. अध्यात्म  नि धर्म मानूनही विज्ञान जगणारे शास्त्रज्ञ. हे सारे धर्माचा विवेकी विचार करणारे लोक होत.

केवळ भावोत्कट होऊन हे लोक धर्म मानत नाहीत. तर धर्माची महत्वाची नीव मूलभूत पाया जी "मानवता" नि जी "सेवा" ही त्यांच्यासाठी महत्वाची आहेत.

म्हणूनच अलीकडे अनुभव नि वाढ ह्यातून

कॅथोलिक चर्च....  "फिदेस क्वेरेन्स इन्तेलेक्तूम"  म्हणजेच  "बुद्धीवादाच्या शोधात श्रद्धा." असे मानू लागले आहे. वाद संवादासाठी अधिक मोकळीक देत आहे. ही जमेची बाजू आहे. हे अलिकडे भरलेल्या पोपच्या दूरगामी  "आम्ही सहप्रवासी येशूचे" ह्या सिनड परिषदेतून अनुभवास आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात मनी उतरणे महाकठीण आहे. त्यात अनेक बुरसटलेले मतप्रवाह आजही आहेत. इतक्या वर्षांच्या धर्मगुरूंच्या घडणीमुळे, सवयीमुळे, परंपरा आणि स्वातंत्र्यामुळे  त्याची अंमलबजावणी आणि ते अंगिकारणे कठीण आहे. हा आतापर्यंतचा ख्रिस्ती धर्माचा, पुरोहित वर्गासंबधीचा रयतेचा अनुभव आहे.

आज विज्ञानवादी प्रापंचिक आणि कर्मठ पाद्री वर्ग ह्यात उडणाऱ्या खटक्यात हे इन्फॅलीबीलीटीचे बीज अजूनही अंकूरत आहे. तरारलेले आहे. म्हणून प्रवचने, शिकवण, वागणे एकतर्फी होत आहेत.

प्रवचनातून मांडलेल्या विचारांवर प्रापंचिकाबरोबर वाद विवाद करण्याच्या तयारीत, मानसिकतेत अजूनही धर्मगुरू नाहीत. सर्व एकतर्फी कारभार आहे. ते अजूनही प्रगत नि वैज्ञानिक भाविकांना मेंढरेच समजतात. नि समजत आले आहेत. प्रबुद्ध असे समजतच नाहीत.

म्हणून माध्यमांवर वाद पेटत रहातात.

चर्च अधिक सुदृढ होण्यासाठी विधायक संवाद हा हवाच... या मुक्त विचारांच्या माध्यमांवर सादर होणाऱ्या लेखकांचे विचार कवीच्या कविता, परस्परातील संवाद आटल्यानेच हे आपापसात खटके उडत आहेत. ह्याच सात्विक संतापातून कवी लेखक व्यक्त, होताना दिसतात. हे धैर्य दाखवणे म्हणजेच त्यांचे चर्चवर विवेकी, विज्ञाननिष्ठ, कार्यकारणभाव मानणारे असे सत्यावर आधारीत प्रेम आहे. मात्र चर्च त्या विचारांना लिखाणाला नकारात्मक समजते हे दुर्दैव आहे.

एक नोव्हेंबर !!

"संतांचा एकोपा".
म्हणजेच संतांचे
सद्शील सदाचारी
सात्विक संस्कारी
आचरण नि विचार.

"पापांची क्षमा"
म्हणजेच
परिवर्तनाकडे
वाटचाल.

"देहाचे पुनरुत्थान"
म्हणजेच
तन मन धन आदी
पारदर्शक
विचारांचे पुनरुत्थान.

त्यासाठीच जगाच्या
कल्याणा
संतांच्या विभूती होत्या.
त्यासाठीच येशूच्या
वदनातून "गीरीप्रवचन"
प्रसवले.
महर्षी महात्मा गांधींचे
आचरणच
सत्य न्याय अहिंसेचे
प्रवचन घडले.

"अंतरी निर्मळ वाचेचे
रसाळ

त्याचे गळा माळ
असो नसो.
आत्मा अनुभवी
चोखळील्या
वाटा...
त्याचे माथा जटा
असो नसो.
परद्रव अंध निंदेशी
जो मुका
तोची संत देखा
तुका म्हणे..."
अशी संतांची व्याख्या
अभंग रचना
तुक्याने  आपल्या
जीवनाभुतीतून
केली आहे.
ख्रिस्ताने आपल्या
गिरी प्रवचनात
आपल्या स्वताच्या
आचरणातून मांडली
आहे.

ज्यांची अंतकरणे
निर्मळ.
ज्यांच्या मुखी शुद्ध
ओवी.
आत्मा अनुभवलेल्या
अशा
संतांच्या गळा माथा
वेगळे आगळे
अलंकार असोत नसोत.
इतरांच्या धना विषयी
ज्यांना लोभ नाही.

मान घडो अपमान
तरी जे सम्यक आहेत.
अशी संत तुकाराम
संतांची व्याख्या
करतात.
दाढी जटा
वाढविलेल्या नकोत...
अंगी पायघोळ झगे,
कफनी, आदी विभूषित
वस्त्रही नकोत.
सद्शील हेच त्यांच धन
कर, शीर, कर्ण, नथ
अंगीची आभुषणे होत.
ताळ मृदुंग ढोल ताशा
नव्हे तर
जेथे वेदना व्याकुळ
जीव तळमळत
असतात त्या सेवेत ही
जमात रमत असते.
परदुखाने त्यांची मने
नुसती हळहळत
नसतात. तर हालचाल
करीत राहतात.
मुठीतून ते शु-मंतर भस्म
अंगार काढीत
नसतात. तर ते
अन्यायाविरुद्ध समाजात
अंगार चेतवीतात.
प्रसंगी परार्था प्राणही
देतात
सुळीही जातात.
कोण वर्तनसाक्षी तर
कोण रक्तसाक्षी संत

बनतात. तर कोण
जितेपणी तर मरणोत्तर
रक्तदान देहदान
अवयव दान करतात.
कोणी स्वामीनाथन
संत शेतात कष्टतो
तर कोणी टाटा
कारखान्यात रमतो
श्रमतो.
अशा जयंत मयंत
संतगणांना
त्रिवार अभिवादन!!!

आगमनकाळ!! (Advent)

...मीना बनसोडे.

Advent हा लॅटीन शब्द आहे. ज्याचा अर्थ "ॲडवेहनायर" या शब्दापासून तयार झाला आहे. म्हणजेच "आगमन" असा आहे. आगमनकाळ ही  येशू ख्रिस्ताच्या बलिदानाइतकीच स्तुत्य आठवण आहे.

जसे की यहुदी ज्यू जनता त्याकाळी मसिहाची संदेष्ट्याची वाट पहात होते. तसेच आज ख्रिस्ती भाविक येशूच्या दुसऱ्या येण्याची आगमनाची वाट पहात आहेत. त्यासाठी तयारी करीत आहेत.

आगमन काळ अपेक्षा आणि आशेच्या भावनांना आमंत्रण देतो. ख्रिस्ताच्या जन्माची आठवण आणि त्यांच्या परत येण्याची आठवण करुन देतो. जीवाशिवाची भेट होईल. देवाशी अद्वैत साधले जाईल असा हा मंगल पवित्र आगमन काळ.

हा आगमन काळ म्हणजे आपण ख्रिस्ताच्या येण्याची वाट पहात असतो. आपली अंतकरणे पश्चात्तापदग्ध तयार करून चिंतन मननासाठी तयार होण्याचा हा परिवर्तनाचा काळ आहे. उन्हाळ्यात झाडे जशी पाने गळून नवीन कोंभाची प्रतिक्षा करीत उभी असतात तसे आपण या काळात देवापुढे आशेने उभे असतो.

हृदय पाळणा साफसूफ करून येशू बाळाला आपल्या अंतकरणाच्या पाळण्यात  नव्याने जन्म देण्यासाठी

देवाचा पुत्र असूनही तो लाभ न मानता मानवरुपी जन्म घेऊन त्याने स्वतःला नम्र केले.

"आगमन" हे सदाहरित वृक्षांवरील पाने , पुष्पे, फळे असे असते. आपल्याकडे सण किंवा कोणाचे लग्न किंवा कोणी पाहुणे आपल्या घरी येणार असेल तर आपण त्याच्या आधीच तयारीला लागतो. त्या पाहुण्यांची किंवा लग्नाची कार्यक्रमाची आपण आतुरतेने वाट पाहत असतो. आणि त्यानुसार आपण त्याच्या स्वागतासाठीची कसलीही कमतरता न ठेवता कार्यक्रमाची आखणी करतो.

जेव्हा पाहुण्यांचे आगमन होते आपण त्याचे प्रेम भरून स्वागत करतो. त्यांचा पाहुणचार व्यवस्थित करतो. लग्नादि कार्यक्रमासाठी दोन-तीन महिने अगोदरच आपण तयारीला लागतो. जेणे करून हा मंगल कार्यक्रम व्यवस्थित रीत्या पार पडला जावा.

त्याच तत्परतेने नि सतर्कतेने आपण नाताळ सणाची तयारी करत असताना. आपल्या अंतकरणात येशूचा पुनर्जन्म होण्यासाठी आपण आपल्या अंतर्यामी अंतकरणाची तयारी करत असतो.

आगमनकाळ हा सदाहरित पुष्पावेली सारखा सदाबहार असतो.  तो तसाच रहावा म्हणून या काळात आपल्या अंतकरणाच्या शुद्ध पवित्र तयारीसाठी आपण प्रतिकात्मक  अशा प्रत्येक रविवारी एक अशा चार मेणबत्ती पेटवतो.

पहिली मेणबत्ती:  " आशेचे प्रतीक"

तिला संदेष्ट्यांची मेणबत्ती असेही म्हणतात.

दुसरी मेणबत्ती: " विश्वासाचे प्रतीक" दाखवते. तिला बेथलेहेमची मेणबत्ती म्हणतात.

तिसरी मेणबत्ती: " आनंदाचे प्रतीक" तिला मेंढपाळांची मेणबत्ती म्हणतात.

आणि चौथी मेणबत्ती:  " प्रेमाचे प्रतीक" तिला देवदुताची मेणबत्ती म्हणतात.

आणि नाताळ दिनी.  ख्रिस्त जन्मोत्सवी

मंगल रात्री सफेद मेणबत्ती जगाचा प्रकाश!! आपला तारक!! जन्मा आला म्हणून हिरव्या रिंगणाच्या अगदी मधोमध चार मेणबत्यामध्ये प्रज्वलीत केली जाते.

ह्या पाचही मेणबत्ती हिरव्या रंगाच्या रिंगणात वेदीवर प्रज्वलीत करतात.

हे हिरवे रिंगण म्हणजे देवाने निर्माण केलेल्या हरित सृष्टीचे प्रतिक आहे. देवाने निर्माण केलेला हा निसर्ग अबाधित हिरवा रहावा. पर्यावरणाचे संवर्धन व्हावे. हा त्यामागील स्तुत्य नि अर्थ आहे.

"दुःखाने होते जग भरले त्यामधुनी तू जन्मा आला. शुष्करुक्ष  जगात हिरव्या कुरणावरती तू हिरवा कोंब म्हणून अवतरलास."  इथल्या मातीचे मार्दव सांगे त्या कोंभाची नवपात्याची लवलव. त्या तृणपात्याचे शांतीच्या राजपुत्राचे स्वागत करण्यासाठीचा हा आगमन काळ आहे.

हृदयाच्या वाटा सरळ करा. डोंगर दऱ्या

खडकाळ भाग सकल स्वच्छ करा. रूक्ष भूमी मऊ भुसभुशीत करा. तन मन धन निगराणीखाली आणून  हृदयांची मशागत करा. असा संदेश ह्या काळात ह्या दिवसात आपणास प्रभूचे शुभवर्तमान सातत्याने देत रहाते. सतर्क ठेवते.

ही झाली प्रभूची वाट पहाण्याची आगमन काळातील आपली अंतर्बाह्य तयारी. परंतु

देवही आपल्या एवढ्याच आतुरतेने ओढीने आपल्याला भेटण्यास उत्सुक आहे. तर मग आपण स्वतास तपासून पाहूया. आपली तयारी नि देवावरील प्रेम विश्वास लाख असेल. पण देवाचा आपल्यावर आपल्या कृत्यांवर श्रद्धेवर

विश्वास बसेल का? हेही तपासून पाहू या.

# INVITATION TO OUR CHRISTMAS PARTY FOR OUR ESPECIALLY ABLED CHILDREN FROM OUR NEIGHBOURHOOD

**DATE:** December 23, 2024
**TIME:** 11.30 AM onwards
**VENUE**: Shrine of the Infant Jesus, Canteen





Bring only yourself along. Come ready to have fun, fun and more fun
Fr. Errol Fernandes SJ and the Jesuit Community
Shrine of the Infant Jesus
Nashik Road